4 MAY 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठाची तयारी पूर्ण; उद्यापासून प्रारंभ, ऑनलाईन, ऑफलाईन स्वरुपातील परीक्षा


# चौदा हजार परीक्षार्थी देणार प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ यावर्षी विविध १५० पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ३९ प्रवेश परीक्षा उद्या, शुक्रवार ते मंगळवार (दि. ९) दरम्यान घेणार आहे. ऑनलाईन आणि ऑफलाईन या स्वरुपातील परीक्षांसाठी सुमारे १४ हजार परीक्षार्थ्यींनी नोंदणी केली आहे, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांची प्रवेश निश्चिती करण्यासाठी या प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.

या परीक्षांची सुरुवात शुक्रवारी (दि. ५ मे) ऑफलाईन पद्धतीने होणार आहे. यात एम. ए. अथवा एम. एस्सी. (भूगोल), मास कम्युनिकेशन, एम. एस्सी. (केमिस्ट्री), बी. जे. सी., एम. जे. सी., एम. एस्सी. अ‍ॅग्रोकेमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट, एम. ए. भाषेच्या (विद्याशाखा बदल) अन्य शाखांचा समावेश आहे. शनिवारी (दि. ६) बी. लिब. सायन्स अँड इन्फर्मेशन सायन्स, एम. लिब. सायन्स अँड इन्फर्मेशन सायन्स, एम. एस्सी. मायक्रोबायॉलॉजी, एम. एस्सी. फार्मास्युटिकल मायक्रोबायॉलॉजी, एम. एस्सी. मॅथेमॅटिक्स, एम. एस्सी. भूगर्भशास्त्र, एम. एस्सी. फिजिक्स, दूरशिक्षण केंद्र- एम. बी. ए. (एक्झिक्युटिव्ह) अँड एम. बी. ए., एम. एस्सी स्टॅटिस्टिक्स, एम. एस्सी. अ‍ॅप्लाईड स्टॅटिस्टिक्स अँड इन्फर्मेटिक्स या परीक्षा होतील.

रविवारी (दि. ७ मे) एम. एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी, एम. एस. डब्ल्यू. (रुरल कम्युनिटी डेव्हलपमेंट), एम. एस्सी. अल्कोहोल टेक्नॉलॉजी, एम. आर. एस. (मास्टर ऑफ रुरल स्टडीज), एम. बी. ए. (रुरल मॅनेजमेंट), एम. टेक. (रुरल टेक्नॉलॉजी) परीक्षा होईल. ऑनलाईन स्वरुपातील परीक्षा सोमवारी (दि. ८) सुरु होतील. यामध्ये एम. एस्सी. बॉटनी, एम. एस्सी. कॉम्प्युटर सायन्सेस, एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. एम. एस्सी. प्राणिशास्त्र, एम. एस्सी. बायोटेक्नॉलॉजी, बायोकेमिस्ट्री, एन्व्हार्न्मेंटल बायोटेक्नॉलॉजी, एम. एस्सी. एन्व्हार्न्मेंटल सायन्स, एम. एस्सी. फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाच्या परीक्षा मंगळवारी (दि. ९) होणार आहेत. यातील ऑनलाईन परीक्षांसाठी ३२७३, तर ऑफलाईन परीक्षांकरिता १०८१४ इतक्या परीक्षार्थ्यांनी नोंदणी केली आहे. प्रत्येक विषयासाठीची प्रवेश परीक्षा ऑफलाईन पद्धतीने ओएमआर शीटद्वारे घेतली जाणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक काकडे यांनी दिली. (प्रतिनिधी)

### केंद्र बदलून मिळणार नाही



या प्रवेश परीक्षा घेण्यांची विद्यापीठाची तयारी पूर्ण झाली आहे. ऑनलाईन स्वरुपातील परीक्षांसाठी ३२७३, तर ऑफलाईन परीक्षांकरिता १०८१४ परीक्षार्थींनी नोंदणी केली असल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली. ते म्हणाले, यंदा परीक्षार्थ्यांना परीक्षा केंद्र बदलून दिले जाणार नाही. विद्यापीठात होणाऱ्या परीक्षांच्या बैठक व्यवस्थेची माहिती देण्यासाठी मानव्यशास्त्र इमारत, ग्रंथालय इमारत, भौतिकशास्त्र अधिविभाग येथे मोठे डिजिटल फलक लावले जाणार आहेत. या परीक्षांचे निकाल साधारणत: २५ मे नंतर जाहीर होतील.

### 'एम.एस्सी. केमिस्ट्री'साठी सर्वाधिक परीक्षार्थी

विद्यापीठातील एम. एस्सी. केमिस्ट्री या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षेसाठी ३९०० परीक्षार्थ्यांनी नोंदणी केली आहे. अन्य अभ्यासक्रमांच्या तुलनेत संबंधित संख्या सर्वाधिक आहे. यातील १७५० परीक्षार्थ्यांची बैठक व्यवस्था विद्यापीठामधील नवीन अभ्यासिका, मानव्यशास्त्र इमारत, ग्रंथालय आणि रसायनशास्त्र विभागात केली आहे. उर्वरित काही परीक्षार्थी सांगली व सातारा येथील केंद्रांवरुन परीक्षा देणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 MAY 2017
सकाळ



# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून प्रवेश परीक्षा

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा शुक्रवारपासून सुरू होत आहेत. सुमारे ३९ प्रवेश परीक्षा होणार आहेत. शुक्रवार ते मंगळवार चालणाऱ्या परीक्षा ऑन व ऑफलाइन पद्धतीने होणार आहेत. यासाठी सुमारे १४ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

सात परीक्षा ऑनलाइन व उर्वरित परीक्षा ऑफलाइन पद्धतीने होतील. यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांतील काही महाविद्यालयांत परीक्षा केंद्र आहेत. ओएमआर पद्धतीने परीक्षा घेतल्या जातील. सुमारे १५० अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 MAY 2017
पुढारी

# एम. एड. केंद्रीय सामायिक प्रवेश प्रक्रिया उद्‌बोधन कार्यक्रम ६ रोजी

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र शासनामार्फत ६ मे रोजी घेण्यात येणाऱ्या एम. एड. केंद्रीय सामायिक प्रवेश २०१७-१८ साठी शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात एक दिसवसीय उद्‌बोधन कार्यक्रम आयोजित केला आहे. कार्यक्रमासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही. इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी शिक्षणशास्त्र विभागाशी संपर्क साधावा, तसेच शिक्षणशास्त्र अधिविभागात दि. ६ रोजी सकाळी साडेदहा वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 MAY 2017
तरुण भारत

# एम.एड. प्रवेशासंदर्भात विद्यापीठात उद्बोधन कार्यक्रम

कोल्हापूर : महाराष्ट्र शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या एम.एड. केंद्रीय सामायिक प्रवेश प्रक्रिया २०१७-१८ साठी शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागात एक दिवसीय उद्बोधन कार्यक्रम आयोजित केला आहे. हा कार्यक्रम शिक्षणशास्त्र अधिविभागात ६ मे रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. या कार्यक्रमासाठी विनामूल्य प्रवेश दिला जाणार आहे. तरी या कार्यक्रमासाठी जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी केले आहे..

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 4 MAY 2017

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या उद्यापासून प्रवेश परिक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर अशा ३९ अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा विद्यापीठासह विविध केंद्रांवर शुक्रवारपासून सुरू होत आहेत. परीक्षेसाठी चौदा हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज केले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 MAY 2017
तरुण भारत

# पदव्युत्तर प्रवेशपूर्व परीक्षा उद्यापासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या पदव्युत्तर ३९ अभ्यासक्रमांसाठी प्रवेश पुर्व परीक्षा शुक्रवार ५ मे पासून सुरू होणार आहेत. कला, विज्ञान, वाणिज्य विभागातून या परीक्षांसाठी १४ हजार विद्यार्थी बसणार आहेत. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, बी. जे. सी., एमे. जे. सी., मास कम्युनिकेशन, सोशल सायन्स, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, पर्यावरणशास्त्र आदी विषयासाठी ५, ६ व ७ मे रोजी सलग तीन दिवस ऑफलाईन परीक्षा होणार आहेत. तर ८ व ९ मे रोजी वनस्पतीशास्त्र, झुलॉजी विषयासाठी ऑनलाईन परीक्षा होणार आहेत. परीक्षा विभागातर्फे या परीक्षा घेण्यासाठी पूर्वतयारी झाली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 MAY 2017
सकाळ

दृष्टिक्षेपात

# शिवाजी विद्यापीठात उद्या डॉ. पवार यांची जयंती

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची १११ वी जयंती शुक्रवारी (ता. ५) साजरी होत आहे. यानिमित्त डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी, शिवाजी विद्यापीठामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता प्रा. चंद्रकुमार नलगे यांचे व्याख्यान होईल. याप्रसंगी डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, पारितोषिक वितरण कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होईल. तसेच विद्यार्थी भवनात राहून शिक्षण पूर्ण केलेल्या, सध्या विविध क्षेत्रांत भरीव कामगिरी करणाऱ्या, विशेष पुरस्कार, सन्मान, पद मिळविणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचेही कौतुक करण्यात येईल. डॉ. पवार यांचा पूर्णाकृती पुतळा विद्यापीठ परिसरात उभा राहावा, यासाठी प्रबोधिनीच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रबोधिनीतर्फे केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 MAY 2017
लोकमत

# विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात उद्या, शुक्रवारी डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या १११ व्या जयंती समारंभानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यानिमित्त सकाळी प्रतिमापूजन व सायंकाळी ५.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात ज्येष्ठ साहित्यिक प्रा. चंद्रकुमार नलगे यांचे व्याख्यान व सत्कार समारंभ आयोजित केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 MAY 2017
पुढारी

# योगा, निसर्गोपचार अभ्यासक्रम १५ पासून

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे योगा, निसर्गोपचार, सूत्रसंचालन, रोपवाटिका (नर्सरी) आदी चार अभ्यासक्रमांचे वर्ग १५ मेपासून सरू करण्यात येणार आहेत. इच्छुकांनी संबंधित विभागांशी संपर्क साधून प्रवेश निश्‍चित करावा, असे आवाहन प्रभारी संचालक डॉ. सुमन बुवा यांनी केले आहे.

4 MAY 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात १५ मेपासून अभ्यासक्रमांना प्रारंभ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे चार अभ्यासक्रम १५ मेपासून सुरू करण्यात येत आहेत. यामध्ये निसर्गोपचार, सूत्रसंचालन, रोपवाटिका (नर्सरी) आणि प्राथमिक योग यांचा समावेश आहे. या सर्व अभ्यासक्रमांना विभागातर्फे जॉब प्लेसमेंटची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांसाठी नोंदणी सुरू असल्याची माहिती प्रभारी संचालक डॉ. सुमन बुवा यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 MAY 2017
महाराष्ट्र टाईम्स

# वरदक्षिणा नकोच...

भारतीय समाजात मुलगा-मुलगी उपवर झाल्यावर विवाह हे सामाजिक दृष्टिकोनातून आवश्यक मानले जाते. विवाह सोहळा हा आपापल्या



पद, पत आणि सामाजिक प्रतिष्ठेनुसार केला जातो. पुन्हा यामध्ये विशिष्ट समाजाच्या रूढी आणि परंपरेनुसार यामध्ये कमी-अधिक खर्च होतो. वारेमाप, सढळपणे लग्न सोहळ्यात खर्च करणारा हा धनाढ्य वर्ग आपल्याकडे आहे. राजस्थान, पंजाब, केरळ या राज्यांमध्ये विवाहसोहळे चर्चेचे विषय आहेत. विशेषत: पंजाब राज्यातील उच्चवर्गात लग्नासाठी कोटीच्या घरात खर्च करणे, ही पद्धत रूढ होत आहे. विवाह हा इव्हेंट्स मानला जात असल्याने खास लग्नासाठी वधूसाठीच्या एका घागऱ्याची किंमत पन्नास लाखांपर्यंत असू शकते. आपापल्या पद्धतीने हा खर्च केला जात असला तरी, मुलीचे मन ठेवण्यासाठी हा खर्च होताना दिसतो. बॉलिवूडच्या चित्रपटांचा प्रचंड मोठा प्रभाव हा भारतीय नव्हे तर परदेशात राहणाऱ्या युवक-युवतींवर आहे. राजस्थानातील उदयपूर शहर हे राजेशाही पद्धतीने विवाह करून देण्यासाठीचे प्रसिद्ध ठिकाण आहे. दागिने, भेटवस्तू, पोशाख, लग्नमंडप यासाठीची स्वतंत्र बाजारपेठ राजस्थानात आहे. पंचतारांकित हॉटेल्स, पॅलेसमध्ये लग्न करण्यासाठीची पसंती मोठी आहे. एका बाजूला खर्चिक लग्नसोहळे होऊन संसार टिकेल याचीही शाश्वती नाही. लग्नानंतर पंधरा दिवसांच्या आत घटस्फोटे घेण्याचेही प्रमाण अत्यंत चिंताजनक आहे.

भारतीय समाजात वरदक्षिणा, स्त्रीधन अशा स्वरूपात हुंडा दिला जातो. वरदक्षिणेमुळे आपल्या मुलीच्या संसाराला आर्थिक हातभार लाभेल, हा विचार यामध्ये असतो. हुंडा घेणे ही एका अर्थाने फॅशनच असल्याने मुलगा जेवढ्या मोठ्या पदावर, श्रीमंत कुटुंबातील असेल तेवढीच अपेक्षा ही मानपान व विवाह खर्च, भेटवस्तू याबाबतीत अधिक असते. आपापल्या बरोबरीच्या कुटुंबात लग्न ठरवले जाते. राजकीय वारसा असलेल्या कुटुंबामध्ये राजकीय पार्श्वभूमी पुरेशी असल्याने जात, धर्म, प्रदेश, भाषा यांचे अडथळे येत नसावेत. सर्वसामान्य कुटुंबासाठी लग्न हा आनंदापेक्षा अधिक चिंतेचा विषय बनला आहे. मुला-मुलीचे शिक्षण, एखादे घर बांधणे, मुला-मुलींचे लग्न करून देणे या चक्रातच मध्यमवर्गीय माणूस अडथळा आहे. नोंदणी पद्धतीने लग्न करणे, मंदिरात लग्न करून देणे हे मार्ग काही प्रमाणात अमलात येत आहेत. प्रेमविवाहातही रितसर हुंड्याची मागणी केली जाते. हुंडा घेणे व देणे हा हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ नुसार गुन्हा असून, १९८५ च्या अधिनियमानुसार भेटवस्तूंची यादी करणे व इतर तरतुदी अपरिहार्य आहेत. हुंड्याच्या विरोधातील १९७०-८० च्या दशकातील महिलांविषय चळवळींची धार ही आता पूर्णत: बोथट झाली आहे. मागच्या आठवड्यातील भिसे-वाघोली या गावातील शेतकऱ्याची २१ वर्षांची मुलगी शीतलने सतत दुष्काळ व नापिकीमुळे आपले वडील हुंडा देऊ शकणार नाहीत म्हणून आत्महत्या केल्याच्या बातमीने महाराष्ट्रातील समाजजीवन ढवळून निघाले. हुंडा प्रथेला विरोध केला पाहिजे, या मताने पुन्हा उचल घेतली. हुंडा न घेणाऱ्याशी लग्न करण्याचा निर्धार हा मुलींनी करून स्वत: आर्थिक सक्षम होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नांदेडमध्ये डॉक्टर मुलीने, लग्नासाठी वरात आल्यावर आणखी एक कार पाहिजे यासाठी अडून बसलेल्या वरपक्षाला लग्नासाठी नकार देऊन, आदर्श उदाहरण तयार केले. कितीही भेटवस्तू, रोख रक्कम देऊनही वरपक्ष समाधानी होत नसतील तर भविष्यात ते त्रास देणार नाही कशावरून? हे ओळखून डॉक्टर युवतीने दिलेला नकार हा समाजाच्या मानसिकतेवर प्रहार करणारा आहे. राष्ट्रीय क्राइम रेकॉर्ड ब्यूरोच्या उपलब्ध माहितीनुसार, देशात २४,७७१ हुंडाबळीची नोंद झाली असून, यामध्ये उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेशनंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात हुंडाबळीच्या नोंदवलेल्या घटनांचे प्रमाण कागदावर ६.७९ दिसत असले तरी गुन्हा नोंद न झालेल्या अनेक घटना घडत असतात. हुंडा प्रथेमुळे मुली असहाय्य, हतबल, निराश होताना दिसतात. नैसर्गिक किंवा अनैसर्गिक मृत्यू, अपघात, आत्महत्या, पेटवून घेणे, फाशी घेणे असे प्रकार सर्रास घडतात. खोट्या सामाजिक प्रतिष्ठा बाजूला करून मुलगी आणि श्रीफळ स्वीकारणारा नवयुवक तयार होणे ही आता काळाची गरज आहे.

● डॉ. निशा मुडे-पवार
nishapawar1968@rediffmail.com